जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार

दुरध्वनी क्रमांक : ०२५६४–२१०१५१ **ईमेल आयडी : mahdhunansc@aij.gov.in**

म.जा.क्र. (रो.व वि.) ३०४४/२०२५ दिनांक : ०६/१२/२०२५

जाहीर नोटीस

विषय : जिल्हा न्यायालय, नंदुरबार व अधिनस्थ न्यायालयांतील बेलीफ यांचेकरीता १३ लेदर बॅग्ज पुरवठा करणेबाबत...

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लेदर बॅग्ज पुरवठा धारक यांना कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय नंदुरबार व अधिनस्थ न्यायालयांतील बेलिफ यांचेकरिता १३ लेदर बॅग्ज पुरवठा करणेसाठी जे पुरवठाधारक इच्छूक असतील, त्यांनी त्यांची दरपत्रके/निवीदा खालील अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक१२/१२/२०२५ रोजीपावेतो मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांचे नांवे बंद लिफाफा समक्ष अथवा टपालाद्वारे सकाळी १०.३० ते ५.०० वाजेच्या दरम्यान जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार या कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या निवीदांचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :–

१. दरपत्रक/निविदा आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नंदुरबार यांच्या नावे असावे व लिफाफयावर **"Quotation for Leather Bag"** असे स्पष्ट व ठळक अक्षरात लिहावे व आपला संपर्कासाठी मोबाईल क्रमांक देखील लिहावा.
२. एकूण १३ लेदर बॅग्जचे दर सर्व करांसहीत नमूद करावे.
३. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके/निविदा स्विकृत केली जाणार नाहीत.
४. दरपत्रक मान्य/अमान्य अथवा पुर्णपणे रद्द करण्याचे सर्व अधिकार कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
५. पुरवठा करण्यात येणारे लेदर बॅग्ज हे सुस्थितीत व चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक आहे.
६. सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पुरवठादारास लेदर बॅग्ज पुरवठा आदेश दिल्यानंतर संबंधितांनी पुढील ०५ दिवसांच्या आंत म.जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथे स्व:खर्चाने लेदर बॅग्ज पुरवठा करावा लागेल.
६. सदर निविदा खरेदी समिती यांचेसमक्ष उघडवितांना आपणास खरेदी समिती नंदुरबार यांचे समक्ष हजर राहणे बंधनकारक राहील, त्याबाबत आपणास कळविण्यात येईल.
७. वस्तुंचा पुरवठा केल्यानंतर त्या संबंधीचे देयक कार्यालयात सादर करावे लागेल. देयक सादर केल्यानंतर कार्यालयामार्फत आपल्या देयकाची रक्कम अदा करणेसंबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

नंदुरबार
दिनांक ०६/१२/२०२५

आदेशावरुन,
(स्वाक्षरी) ६/१२/२५
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार.
२. संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार
यांना जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटर अपलोड करणेसाठी